**प्रेस नोट दिनांक १३/०७/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**भेदरलेल्या व हरविलेल्या परिस्थितीमध्ये रिक्षामध्ये मिळुन आलेल्या लहान मुलाचे नातेवाईकांचा शोध घेऊन मुलास नातेवाईकांचे ताब्यात सुखरुप परत.**

-----------||-----------

दि. ११.०७.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे अंकित असलेल्या कासेवाडी बीट मार्शलवरील पोलीस कर्मचारी पोलीस शिपाई ९९२४ पाटेकर, पोलीस शिपाई ७६९६ कांबळे हे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना नियंत्रण कक्ष येथुन कळविण्यात आले की, भवानी पेठ, क्षेत्रिय कार्यालयाजवळ एक लहान मुलगा रिक्षामध्ये रडत बसलेला आहे. नमुद कर्मचारी यांनी सदर कॉलचे अनुषंगाने तात्काळ भवानी पेठ, क्षेत्रिय कार्यालयाजवळ पुणे या ठिकाणी पोहचले. सदर ठिकाणी एका रिक्षामध्ये एक लहान मुलगा रडत असलेला दिसुन आला.

नमुद कर्मचारी सदर लहान मुलास त्याचे घराबाबत विचारुन तो सांगेल त्याप्रमाणे त्याचे घर शोधुन काढुन त्याचे राजीव गांधीनगर, कासेवाडी, भवानी पेठ, पुणे येथील घराजवळ पोहचले. सदर ठिकाणी असलेली महिला - हिना अबीत शेख यांनी सदरचा मुलगा - मुस्तफा अबीत शेख, वय ०४ वर्ष हा आपला मुलगा असुन तो वडीलांसोबत गेला होता असे सांगीतले. सदर मुलास त्याचे आईचे ताब्यात सुखरुप देण्यात आलेले आहे.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

